(९)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र. मजीप्रा/सस/आस्था-४/२३६ दिनांक : २८ ऑक्टोबर, २००५

विषय : **दिनांक १९ ऑक्टोबर, २००५ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०१ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक १९ ऑक्टोबर, २००५ दुपारी १.० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०१ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

**( दीपक भसाळे )**
**सदस्य सचिव**

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग**

**मा. मंत्री,**
**पा.पु. व स्व.,**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

16.11.2005

Oct-05/89

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०१ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०१ वी सभा मा.मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ ऑक्टोबर-२००५ दुपारी १.०० वाजता संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.श्री.रणजित कांबळे, राज्यमंत्री, पा.पु.व स्व.तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.श्री.राजेश टोपे,राज्यमंत्री, नगर विकास तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४. श्री.विश्वास धुमाळ, प्रधान सचिव,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे सदस्य.
५. श्री.ना.बा.पाटील, प्रधान सचिव (२) नगरविकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६. श्री.पी.बी.पाण्डे,प्रधान सचिव,(उर्जा)उद्योग उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
७. श्री.दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
८. श्री. बी.के. नाईक, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. श्री.चं.स. केंगळे, अवर सचिव,(वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.**

१. श्री.हेमंत लांडगे, विशेष कार्य अधिकारी व अधीक्षक अभियंता (समन्वय) मजीप्रा, मुंबई
२. श्री.एस.व्ही. दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा. ठाणे
३. श्री.एम.व्ही.दोमकोंडवार, मु.अ. म.जी.प्रा. औरंगाबाद.
४. श्री.प्र.वा. पांढरीपांडे, वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा. नवी मुंबई.
५. श्री.बी.एस. पाटील, उप-मु.ले.अ.,म.जी.प्रा. नवी मुंबई.
६. श्री.द.चि. सुर्यवंशी, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा. मुंबई.
७. श्री. वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, ठाणे
८. श्री.एस.सी. त्रिवेदी, अधीक्षक अभियंता (यां.) म.जी.प्रा.मंडळ, नागपूर.
९. श्री.एस.पी. भातखंडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
१०. श्री.दि.गि. वेलके, प्र.नि.आ.अ., म.जी.प्रा. नवी मुंबई.

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०० व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक १९.४.२००५ रोजी झालेल्या १०० व्या सभेच्या इतिवृत्ताचा सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०१ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

या कार्यक्रम बाबीतील प्रत्येक कार्यक्रम बाबींवर करण्यात आलेल्या कृती बाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाला माहिती करुन दिली. सर्वसाधारण चर्चेनंतर सदर बाबीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३: राज्य शासकीय सार्वजनिक उप क्रमाने शिल्लक निधी गुंतवण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबी संबंधी सविस्तर माहिती सदस्य सचिव व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास विषद केली. मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी सदर कार्यक्रम बाब संचालक मंडळापुढे गेल्या तीन बैठकीपासून येत असून, कार्यक्रम बाबी सोबत जोडलेल्या विवरण पत्रामध्ये पंजाब नॅशनल बँकेमध्ये दिनांक १२.४.२००५ रोजी तीनदा १७ दिवसासाठी केलेल्या गुंतवणूकीसंदर्भात ३.७५ % व ४ % असे वेगवेगळे व्याज असल्याबाबत विचारणा केली. तसेच दि.५.४.०५ व ६.४.०५ रोजी सिकॉम बँकेत केलेल्या गुंतवणुकीत १ दिवसाचा फरक असला तरी व्याजामध्ये ०.२५ टक्केचा फरक आहे. जास्त व्याज मिळण्यासाठी दि.५.४.०५ ची गुंतवणूक दि. ६.४.०५ पर्यंत का केली नाही अशी विचारणा करुन त्याबाबत असमाधान व्यक्त केले. मा.अध्यक्ष यांनीही व्याज दरामध्ये विसंगती असल्याने, सदर कार्यक्रम बाब तपासून वस्तूस्थिती संचालक मंडळाच्या पुढील बैठकीपुढे ठेवण्यात यावी असे आदेश दिले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.४: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उप विधी १९८९ मधील उप विधी क्र.३ कलम-५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा योजनेतील जलमापन यंत्राच्या मासिक भाड्याबाबतच्या सुधारीत प्रस्तावाबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०० व्या बैठकीपुढील बाब क्र.१९ नुसार फक्त गोंदिया पाणी पुरवठा योजनेसाठी जलमापक यंत्राचे मासिक भाडे सुधारीत करण्याचा प्रस्ताव बैठकीपुढे ठेवण्यात आला होता. तथापि, संचालक मंडळाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सर्व पाणी पुरवठा योजनेकरीता सर्वकक्ष जलमापक यंत्राचे भाडे ठरविण्याचा सुधारीत प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानुसार सुधारीत कार्यक्रम बाब संचालक मंडळापुढे ठेवण्यात आली आहे. मा.सदस्य सचिव यांनी सदर बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती निदर्शनास आणून दिली. मा. राज्यमंत्री, पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी सदर बाबींवर चर्चा केली. उपविधी शासन मान्यतेने तयार झालेले असून सुधारीत जलमापन यंत्राच्या मासिक भाडयास शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.५: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कर्ज रोख्याद्वारे उभारण्यात आलेल्या निधीची पूट / कॉल ऑप्शनद्वारे परतफेड.**

उपरोक्त कार्यक्रम बाबी संबंधी सविस्तर माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी विषद केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने भांडवली बाजारातून आतापर्यंत १ ते १२ मालिकाद्वारे उभारलेली रक्कम तसेच कर्जरोखे धारकांना केलेली परत फेड व उर्वरीत दायित्वे बाबतची माहिती संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. यावर प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी अशी विचारणा केली की, जास्त दराच्या कर्जरोख्यांची परत फेड का केली जात नाही यावर अशी माहिती देण्यात आली की, मालिका-२ ही सर्वाधिक व्याज दराची कर्ज रोखे मालिका दिनांक १५.१०.२००५ रोजी या कर्जरोख्याची मुदत संपल्याने परतफेड केली आहे. तसेच आवेदन पत्रातील तरतूदीनुसार पुट / कॉल ऑप्शन व्यतिरिक्त कर्ज रोख्याची परतफेड करता येत नाही. ही बाब विचारात धरुन कॉल ऑप्शनद्वारे जास्त व्याज दराचे कर्ज रोखे मालिका ४ व ५ बाबतीत कॉल ऑप्शनचा पर्याय वापरुन रक्कम परत करण्यास शासनाने मान्यता दिली असून आता पर्यंत रु. १२८.४२ कोटी परत करण्यात आले आहेत व उर्वरीत कर्जरोख्यांपैकी जास्त व्याज दराची रक्कम कॉल ऑप्शनद्वारे परत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. जस जसे शासनाचे आदेश प्राप्त होतील तस तशी रक्कम परत करण्यात येईल.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.६: प्रगतीपथावरील नागरी पाणी पुरवठा योजनासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून नव्याने घ्यावयाचे कर्ज.**

उपरोक्त कार्यक्रम बाबी संबंधी सविस्तर माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास विषद केली. चर्चे अंती सदर बाबीस मान्यता देण्यात आली. याबाबत आवश्यक तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.७: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन-२००२-२००३ या वर्षाच्या वार्षिक लेखा परिक्षणास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००२-२००३ या वर्षाचे लेखे दिनांक २७.१.२००४ रोजी झालेल्या ९६ व्या सभेत स्विकृत झाले आहेत. महालेखापाल, लेखा परिक्षण, मुंबई यांनी या वार्षिक लेख्याचे परिक्षण करुन त्यांचे पत्र क्र.अहवाल-III/मजीप्रा/अेआर/२००२-०३/५७२ दिनांक २१.१२.२००४ अन्वये अंतिम लेखा परिक्षण अहवाल प्रमाणपत्रासह सादर केले. लेख्याच्या स्थितीबाबत सर्वकष माहिती वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी विषद करुन प्राप्त अंतिम लेखा परिक्षण अहवालाच्या अनुपालनाबद्दल विदित केले व अनुपालन अहवाल प्राधिकरणाच्या मंजूरीकरीता सादर केला. या मंजुरीनंतर प्रमाणित लेखे व लेखा परिक्षण अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात येणार आहे, ही बाब स्पष्ट करण्यात आली. या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन निलंबन लेखा शिर्षाखाली शिल्लकीचा निपटारा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन सन २००२-२००३ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास व त्यावरील अनुपालनास मान्यता देण्यात आली. सन २००२-२००३ वर्षाचे लेखे व त्यावरील लेखा परिक्षण अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.८: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००२-२००३ या वर्षाच्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.**

मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी वार्षिक अहवालातील प्रत्येक बाब संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिली. तथापि, कार्यक्रम बाबी सोबत जोडलेल्या परिशिष्ठ नऊ मधील माहिती इंग्रजीत असल्याचे, मा. प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग यांनी निदर्शनास आणून दिले. त्यावर मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी मराठी भाषेत परिशिष्ठ

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

नऊ भाषांतर करुन त्यानंतरच हा अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात येईल असे नमूद केले. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ९: दिरंगाईने कामे करणाऱ्या तसेच निविदेचा ग्राहयता कालावधी वाढवून न देणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कारवाई..**

पाणी पुरवठा योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध असूनही ठेकेदार कामात दिरंगाई करीत असेल तर सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता व स्वीकृत निविदेतील कलम-२ व ३ नुसार कंत्राटदारावर करावयाच्या कारवाईच्या प्रक्रियेत खूप कालावधी जातो. अशा कंत्राटदारांना काळया यादीत टाकावयाचे झाले तरी काळया यादीत टाकण्याची प्रक्रिया खूप क्लिष्ट व वेळखाऊ आहे. तसेच एखाद्या निविदेच्या बाबतीत निविदा स्विकृतीची प्रक्रिया सुरू असताना प्रशासकीय अडचणींमुळे काही वेळा प्राप्त देकार विहित मुदतीत स्वीकृत करणे शक्य नसते. अशा वेळी लघुत्तम देकार देणाऱ्या ठेकेदारांस निविदेचा ग्राहयता कालावधी (Validity Period) वाढवून देण्यास विनंती करण्यात येते. लघुत्तम देकार देणाऱ्या कंत्राटदाराने निविदेचा ग्राहयता कालावधी (Validity Period) वाढवून देण्यास असमर्थता दर्शविल्यास किंवा ग्राहयता कालावधी मुद्दाम वाढवून न दिल्यास पुन्हा अशा निविदेची नव्याने प्रक्रिया सुरू करावी लागते व त्यात कालापव्यय होतो. अशा प्रवृत्तीच्या कंत्राटदारावर निश्चित व कमी वेळात परिणाम करणारी कारवाई करण्याच्या दृष्टीने अशा कंत्राटदारांची मजीप्राकडील नोंदणी निलंबीत करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यक्रमबाबीव्दारे संचालक मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे ही बाब सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर सविस्तरपणे विशद केली. त्यावर सविस्तर चर्चा झालेनंतर निविदा ग्राहयता कालावधी वाढविणेसंबंधी सूचविलेली कार्यवाही करण्याची आवश्यकता नसून प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.

**ठराव :**

पुरेसा निधी उपलब्ध असूनही कंत्राटदार कामात दिरंगाई करीत असेल व निविदा शर्तीनुसार दंडात्मक कारवाई करुनही कामात समाधानकारक प्रगती दाखवत नसेल तर अशा कंत्राटदारांची नोंदणी ३ वर्षासाठी निलंबीत करण्यात यावी. सदर नोंदणी निलंबीत करण्याचे अधिकार जे अधिकारी ज्या वर्गाच्या नोंदणीस सक्षम आहेत त्या अधिकाऱ्यांना देण्यात यावी. या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रचलित कंत्राटदार नोंदणी नियमावलीत योग्य ते बदल करण्यासही मान्यता देण्यात आली. यापुढील निविदांमध्ये अशाप्रकारचे कलम अंतर्भूत करण्यास मान्यता देण्यात येऊन पुढील आवश्यक कारवाई करण्यास सदस्य सचिव (तांत्रिक) यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १०: अजिंठा-वेरुळ लेणी विकास प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी इ.टी.पी. चार्जेसबाबत..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जे.बी.आय.सी. (जपान सरकार) अर्थसहाय्याने अजिंठा-वेरुळ लेणी विकास प्रकल्प, टप्पा-२ अंतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विनंतीनुसार वेरुळ लेणी पाणी पुरवठा योजना, टप्पा-२ व अजिंठा लेणी व्ह्यू पॉईंट पाणी पुरवठा योजना अनुक्रमे रु. ५५२.८६ व रु. २८.२५ लक्ष ढोबळ किमतीच्या योजना पूर्ण ठेव तत्वावर राबवावयाच्या आहेत याबाबतची सविस्तर माहिती मुख्य अभियंता, मजीप्रा, औरंगाबाद यांनी संचालक मंडळासमोर विषद केली असता सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या इ.टी.पी. स्वरुपात प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पूर्ण ठेव तत्वावरिल अजिंठा-वेरुळ लेणी विकास प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत करावयाच्या पाणी पुरवठा योजनांसाठी १७.५% ऐवजी १२% इ.टी.पी. चार्जेस आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर इ.टी.पी. चार्जेसचा खर्च अजिंठा-वेरुळ लेणी विकास प्रकल्प टप्पा-२ या जपान सरकार अर्थ सहाय्य प्रकल्पाच्या खर्चाचा भाग म्हणून समजण्यात यावा व त्यासाठी जपान सरकार तयार नसेल तर हा खर्च महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने सोसावा अशी शिफारस करण्यात येत असून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र. ११: २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे उल्हास नदीवरील बॅरेज बंधारा वाहून गेल्यामुळे अंबरनाथ व कुळगांव बदलापूर शहराच्या पाणी पुरवठयासाठी बंधारा व शीर्ष कामांचा समावेश असणारी पाणी पुरवठा योजना राबविणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती सदस्य सचिव आणि संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी विशद केली. हया बाबींवरील चर्चेत भविष्यात जर अशी आपत्कालीक परिस्थिती उद्‌भवली तर मुंबई परिसरातील उपनगारांचा पाणी पुरवठा विस्कळीत होऊ नये म्हणून मुंबई परिसरातील सर्व महानगरपालिकांकरिता एक ग्रीड लाईन टाकून अशा आपत्कालिक परिस्थितीत पाणी पुरवठा सुरळीत करणे शक्य होईल असे मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. यांनी सूचीत केले. त्या अनुषंगाने अशी ग्रीड लाईन टाकणेसाठी काय उपाय योजना करावी लागेल याचा सर्वकष आढावा घेऊन आवश्यक तो प्रस्ताव मुख्य अभियंता

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

(को.वि.), मजीप्रा, ठाणे यांनी तयार करुन संचालक मंडळासमोर सादर करण्यात यावा असे ठरविण्यात आले व प्रस्तावित बाब संबंधीचा ठराव खालीलप्रमाणे संमत करण्यात आला.

**ठराव :**

१) प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित योजनेस प्रचलित वित्तीय आकृतीबंध न लावता प्रस्तावित कामासाठी येणारा रु. ७.७५ कोटी इतका खर्च, शासनाकडून मिळणाऱ्या निधीतून करण्याचे प्रस्तावित करुन योजनेची अंदाजपत्रके व नकाशे शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी तातडीने सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मान्यता मिळणेपूर्वी प्रस्तावातील कामांच्या निविदा मागविण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

३) वरील योजना शासनास सादर करणे, योजनेस प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर योजनेची अंमलबजावणी करणे यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२: दि.२६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बदलापूर बॅरेज पाणी पुरवठा केंद्राचे झालेले अतोनात नुकसान व त्या अनुषंगाचे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत युध्द पातळीवर केलेल्या दुरुस्ती कामांना विशेष देखभाल व दुरुस्ती अंतर्गत निधी मंजूर करणेबाबत.**

दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी उल्हास नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीला अभूतपूर्व महापूर आला होता. कुळगांव-बदलापूर, अंबरनाथ शहरासह आयुध निर्माण कारखान्याच्या पाणी पुरवठा योजनेचा उद्‌भव असलेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे बदलापूर बॅरेज तसेच पाणी पुरवठा केंद्र तसेच तेथील संपूर्ण परिसर पाण्याखाली गेला होता. पाणी पुरवठयाची निर्माण झालेली आपत्कालीन स्थिती विचारात घेऊन खंडीत झालेला पाणी पुरवठा पूर्ववत सुरू करण्यात यावा असे मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे सदर पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी स्वत: भेट देऊन पाणी पुरवठा युध्द पातळीवर सुरळीत करण्याचे निर्देश दिले होते. या सर्व बाबींचा विचार करुन सदर पाणी पुरवठा केंद्रावर असलेल्या नियमित तरतूदीतून वरील कामे करण्यात येऊन पाणी पुरवठा चालू करण्यात आला असला तरी अद्यापही काही कामे हाती घेऊन उर्वरित कामे पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने केलेल्या कामावर तसेच अद्याप हाती घ्यावयाच्या कामांकरिता

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कराव्या लागणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकरिता सदरची कार्यक्रम बाब संचालक मंडळासमोर सादर केलेली आहे असे मुख्य अभियंता (को.वि.), म.जी.प्रा., ठाणे यांनी विषद केली असता खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव :**

१) प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे आपत्कालीन परिस्थितीत पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी केलेल्या रु. ३७७.७९ लक्ष खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अद्यापही हाती घ्यावयाच्या दुरुस्तीच्या उर्वरित कामासाठी येणाऱ्या संभाव्य रु. ९५.०१ लक्ष खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. यानुसार सदर कामासाठी लागणाऱ्या एकूण रु. ४.७३ कोटी इतका निधी शासनाकडून मिळविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये झालेल्या नुकसानीपोटी शासनाकडे मागणी केलेनुसार उपरोक्त झालेल्या व होणाऱ्या खर्चाचे समायोजन करण्यास त्याचप्रमाणे जर सदर निधी प्राप्त झाला नाही तर सदर पाणी पुरवठा केंद्राच्या पाणी पुरवठा केंद्रासाठी असलेल्या तरतूदीतून विशेष बाब म्हणून वरील खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या वरील पाणी पुरवठा केंद्रासाठी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन २००५-०६ या वर्षासाठी देखभाल व दुरूस्तीची रु. १५.७३ कोटी इतकी सुधारीत तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १३: भंडारा येथे विभागीय कार्यालय तसेच उप-विभागीय कार्यालयासाठी प्रशासकीय इमारत बांधणेबाबत..**

भंडारा येथील कार्यालयीन इमारत बांधण्यासाठी जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी पाठपुरावा केला होता. या अनुषंगाने जिल्हाधिकारी, भंडारा यांनी २१८८.६० चौरस मीटर जागा निशुल्क पण काही अटी व शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरणास उपलब्ध करुन दिली आहे. सदर जागेवर अद्यापपर्यंत कोणतेही बांधकाम न झाल्याने या जागेपैकी ८०१.३५ चौरस मीटर जागा जिल्हाधिकारी कार्यालयाने दुसऱ्या विभागास हस्तांतरीत केली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने, जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे सातत्याने प्रयत्न

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

करुन उर्वरित १३८७.२५ चौरस मीटर जागा कार्यकारी अभियंता, मजीप्रा, विभाग भंडारा यांचे नावे हस्तांतरीत करुन घेण्यात आली आहे. या जागेवर जर तातडीने कार्यालयीन इमारत बांधली गेली नाहीतर ही जागा देखील दुसऱ्या विभागास हस्तांतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई यांनी विशद केली. याबाबत सध्या मजीप्राच्या ताब्यात असलेल्या जागेस संरक्षण भिंत घालून घेण्यात यावी. तसेच दरम्यानच्या काळात या जागेवर बांधावयाच्या कार्यालयीन इमारतीचा नकाशा तसेच अंदाजपत्रके व आराखडे वास्तु विशारद यांचेकडून तयार करण्यास व ते संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१४: गोदींया पाणी पुरवठा योजना..**

**योजनेस पुरेशा दाबाने विद्युत पुरवठा होणेकरिता नवीन एक्सप्रेस फिडर टाकण्याच्या कामास निधी उपलब्ध होणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई यांनी विषद केली असता गोंदीया पाणी पुरवठा योजनेच्या डांगुर्ली येथील पुरवठा विहिरीजवळ एक्सप्रेस फिडरमेनच्या कामासाठी वाढीव रक्कम रु. १२.५४ लक्ष व कुडवा येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी नव्याने टाकावयाच्या एक्सप्रेस फिडरकरिता रु.१३.५० लक्ष असे एकूण रु. २६.०४ लक्ष प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करण्यास मंजूरी देण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १५: अंबरनाथ व कुळगांव बदलापूर शहरासाठी २४X७ पाणी पुरवठा संकल्पनेसह आदर्श नमुना पाणी पुरवठा योजना राबविणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती सदस्य सचिव, मुख्य अभियंता (को.वि.), म.जी.प्रा., ठाणे यांनी विषद केली असता खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव :

१) अंबरनाथ, कुळगांव बदलापूर शहरासाठी २४ x ७ पाणी पुरवठा करणे या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा व्यवस्थेचा व नव्याने मंजूर झालेल्या योजनेतील तसेच स्त्रोत विकासाच्या प्राधान्याने हाती घ्यावयाच्या कामांचा सर्वंकष आढावा घेऊन

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

प्रस्तावित कामांचा आदर्श असा पथदर्शी पा.पु.योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) सामंजस्य करार (M.O.U) करण्यासाठी सल्लागार नेमणे तद्नंतर प्रकल्प अहवालानुसार "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर योजना राबविण्यासाठी Expression of Interest (E.O.I.) मागविण्यासाठी येणारा प्राथमिक खर्च रु. १५.०० लक्ष पाणी पुरवठा केंद्राच्या देखभाल व दुरूस्तीसाठी असलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करणार असलेल्या या खर्चाची वसुली कमीत कमी देकार असलेल्या कंत्राटदारांकडून नंतर करण्यात येऊन त्या खर्चाचे समायोजन करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्प अहवालानुसार "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" या तत्वावर काम करण्यास इच्छूक ठेकेदार/संस्थेकडून Expression of Interest मागवून कंत्राटदारांची रीतसर नियुक्ती करण्यात यावी, या बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१६: सिल्लोड वाढीव पाणी पुरवपठा योजनेवरील शिल्लक राहिलेले आयुर्विमा कर्ज सद्यःस्थितीला प्रगतीपथावर असलेल्या पुर्नरचित वाढीव सिल्लोड पाणी पुरवठा योजनेवर वळते करणे व अखर्चित कालावधीसाठीचे कर्जावरील व्याज माफ करणे.**

फेब्रुवारी-१९९५ मध्ये कार्यान्वित झालेल्या सिल्लोड योजनेचा उद्भव न्यायालयाचे स्थगिती आदेशामुळे अजिंठा - अंधरी ऐवजी जवळ असलेला खेळणा प्रकल्प घेतल्यामुळे रु. १३४.६० लक्षचे आयुर्विमा कर्ज अखर्चित राहिले. सन १९९७ मध्ये रु. १२.४८ कोटीची नवीन योजना मंजूर झाली. त्या अंतर्गतची कामे ऑगस्ट-१९९८ मध्ये सुरु झाली. त्यामुळे ४२ महिन्याच्या कालावधीसाठी अखर्चीत कर्ज महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे शिल्लक राहिले. अशा अखर्चीत रक्कमेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने बँकेत गुंतवणूक करुन व्याज मिळविले नसल्याचे मुख्य अभियंता यांनी विशद केले. तथापि, अशा अखर्चित रक्कमेवरील व्याजाचा भुर्दंड नगरपरिषदेने सोसणे योग्य नसल्याचे ठरले. नगर परिषदेस जरी १३ टक्के व्याज आयुर्विमा महामंडळास द्यावे लागले असले तरी ६ टक्के व्याजाने नगरपरिषदेस व्याजातून सूट देणे योग्य राहील असे चर्चे अंती ठरले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेशी चर्चा करुन सुटपात्र रक्कम ठरविण्यांचे ठरले.

**ऐनवेळचा विषय : संयुक्त जालना-अंबड पाणी पुरवठा योजना...**

सदर बैठकीत संयुक्त जालना-अंबड पाणी पुरवठा योजनेबाबत चर्चा उपस्थित झाली. सदर चर्चेत मा.नामदार राजेश टोपे, राज्यमंत्री, नगरविकास यांनी योजनेपोटी नगरपरिषदेवर निर्माण झालेल्या दायीत्वाचा विषय उपस्थित केला.

अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था तसेच नगरपरिषद यांच्यात थकबाकीबाबत एकमत होत नसल्यामुळे हा प्रश्न निकाली काढण्याकरिता लवादाची नेमणूक करावी अशी सूचना त्यांनी केली. यावर ही बाब तपासून योग्य ती कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले.

योजनेंतर्गत अशुध्द व शुध्द जल उध्दरण वाहिनीकरिता अंतर्गत अस्तरीकरण केल्यास योजनेची ही उपांगे अधिककाळ उपयुक्त ठरतील किंवा कसे याबाबत चर्चा करण्यात आली. शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या खडकपूर्ण उद्भव धरुन नवी नळ पाणी पुरवठा योजना करणे अथवा शहागड जालना वाहिनी बळकटीकरण करणेचा सत्वर निर्णय घेणेबाबत मा.राज्यमंत्री यांनी सूचना केली. सदर वाहिनीचे अंतर्गत सिमेंट अस्तरीकरण करणे अनिवार्य असल्याचे बैठकीत संबंधित मुख्य अभियंता यांनी सांगितले. चालू वर्षी घाणेवाडी तलावात पर्याप्त मात्रेत पाणी उपलब्ध झाले असल्याने अस्तित्वातील ९ द.ल.लि.व ६ द.ल.लि. क्षमतेची जलशुध्दीकरण केंद्र उचीत दुरुस्ती करुन वापरल्यास थोडया प्रमाणात कमी पाणी देऊन पाणी पुरवठा करणे योग्य राहील. ही बाब देखील मुख्य अभियंता यांनी विशद केली. चर्चेअंती अंतर्गत सिमेंट अस्तरीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक असल्याने ते सुरु करण्याबाबत मुख्य अभियंता यांनी योग्य ती कार्यवही करावी असे ठरले.

वरीलप्रमाणे चर्चा व निर्णय झालेनंतर उपस्थितांचे आभार प्रदर्शित करुन बैठक संपल्याचे मा.अध्यक्ष यांनी घोषित केले.



मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.